# बाजार समितीतर्फे केवायसी ( Know Your Committee ) उपक्रम.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती ही १९४५ पासून कोल्हापूर शहरात कार्यरत आहे. जवळपास सात तालुक्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या या बाजार समितीमध्ये दरवर्षी सुमारे ९०० कोटी रूपयांच्या मालाची उलाढाल होते. प्रामुख्याने गूळ, फळे, भाजीपाला, कांदा, बटाटा, आल्ले, लसूण तसेच धान्य इ. शेतीमालाची मोठया प्रमाणात आवक व खरेदी विक्री या बाजारात होत असते. कोल्हापूर जिल्हयाच्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत मोलाचा सहभाग असलेल्या या बाजार समितीने अनेक लोकाभिमुख उपक्रम हाती घेतले आहेत. बाजार आवारातील स्वच्छता, सोयी–सुविधा इत्यादी बरोबरच शहरी ग्राहकांसाठी उच्य प्रतीचा गूळ रास्त किंमतीत उपलब्ध व्हावा म्हणून शेतकरी ते ग्राहक थेट गूळ विक्री केंद्र यावर्षी ७ डिसेंबर पासून प्रत्येक शनिवार आणि रविवारी समितीच्या राजर्षी शाहू मार्केट यार्डात सुरू करणेत आले आहे. परंतू अजूनही गेली ७३ वर्षे कोल्हापूर शहरात असणा–या या मार्केट यार्डविषयी तसेच तिथे होत असलेले शेतीमालाचे सौदे, खरेदी–विक्रीच्या पध्दती, शेतातून निघालेला माल आपल्या घरात येईपर्यतच्या त्याच्या प्रवासाविषयीही शहरी मध्यमवर्गीय अनभिज्ञ आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टीची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यत पोहोचविण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून बाजार समितीने शालेय व महाविद्यालयीन विदयार्थ्यासाठी ' केवायसी ' अर्थात Know Your Committee हा उपक्रम राबविणेचे ठरविले आहे. या उपक्रमांतर्गत इयत्ता ९ वी पासून ते पदव्युत्तर महाविदयालयीन विदयार्थ्यांना बाजार समितीच्या राजर्षि शाहू मार्केट यार्ड आवारात शेतीमालाची प्रचंड आवक व सौदे होतांना त्याची केली जाणारी व्यवस्था, दररोज अवघ्या ४ तासात जवळपास ६०० टन गुळाची तसेच शेकडो टन फळे–भाजीपाल्याची खरेदी विक्री कोणत्या प्रकारे होते, शेतीमालाच्या नियंत्रणासाठी बाजार समिती कसे काम करते इ.ची प्रत्यक्ष माहिती आणि त्याद्वारे शिकण्याची संधी या उपक्रमाद्वारे उपलब्ध करून देणेत येत आहे. आजच्या मार्केटिंगच्या युगात वाणिज्य तसेच व्यावसायिक शिक्षणक्रमात असणा–या विदयार्थ्यांना आपली ज्ञानकक्षा रूंदावण्यासाठी हे गरजेचे आहे.

हा उपक्रम सोमवार ते गुरूवार आणि शनिवार या दिवशी सकाळी ८ ते ११ या वेळेत राबविला जाणार असून कोल्हापूर शहर आणि आसपासच्या शाळा, महाविदयालये तसेच एमबीए, बीबीए, कृषि इ. व्यावसायिक अभ्यासक्रम घेणा–या संस्था बाजार समितीशी संपर्क साधून आपल्या भेटीचे नियोजन करू शकतील. बाजार समितीचे अधिकारी स्वतः उपस्थित राहून माहिती देतील. या उपक्रमाचा लाभ घेऊ इच्छिणा–या शाळा व महाविदयालयांनी बाजार समितीच्या २६५१४०४ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा उपसचिव श्री. विजय नायकल यांना ८३०८०७१९९९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.